महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा
एस. टी. बस स्टँडच्या बाजुला, बुलडाणा - ४४३००१
(E-mail - Address : buldhana.ee@mahapwd.com)
Web-www.mahapwd.com / दुरध्वनी क्रमांक २४२३९८

जाहिरात क्रमांक ९५१५ / आस्था-१ / २०१९ / दिनांक :- २६.१२.२०१९

सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा अंतर्गत खालील संवर्गातील पद सरळ सेवाभरतीने सामाजिक आरक्षण अंतर्गत भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून सोबतच्या नमुन्यातील अर्ज खालील नमुद केलेल्या ठिकाणी व्यक्तीश: किंवा टपालाने **दिनांक** ६.१.२०२० रोजी सायंकाळी **५.३०** वाजेपर्यन्त किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. **दिनांक** ६.१.२०२० नंतर टपालाने वा कोणत्याही मार्गे प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

रिक्त पदांचा तपशिल

अ क्र	पदनाम व गट	एकुण भराव याची पदे	वेतन बँड	सामाजिक आरक्षण	समांतर आरक्षण							सर्व - साधारण पदे	एकुण भराव याची पदे
					माजी सैनिक	महिला	खेळाडू	दिव्यांग	पदविधर / पदविकाधारक अंशकालीन	प्रकल्प ग्रस्त	भुकंप ग्रस्त		
१.	शिपाई (गट-ड)	१	एस-१ : - १५००० - ४७६००	अनुसूचित जमाती	०	०	०	०	०	०	०	१	१

अ.क्र.	पदनाम व गट	किमान शैक्षणिक अर्हता (म.शा.राजपत्र सा.प्र.वि.अधिसुचना दि.६.६.२०१७)
१.	शिपाई (गट-ड)	कमीत कमी १२ वा वर्ग पास असावा.

वयोमर्यादा :-उमेदवाराचे वय अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांकास १८ पेक्षा कमी नसावे व सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवारासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (म.शा.राजपत्र सा.प्र.**वि.अधिसुचना दि.**६.६.२०१७) शासन तरतुदीनुसार त्यांच्या समोर खालील प्रमाणे दर्शविल्यानुसार उच्च वयोमर्यादेत शिथीलता आहे.

१. महा. शासनाने मान्यता दिल्या नूसार मागासवर्गीय उमेदवार ४३ वर्षा पर्यंत
२. दिव्यांग उमेदवार ४५ वर्षा पर्यंत
३. प्रकल्पग्रस्त ४५ वर्षा पर्यंत
४. माजी सैनिक महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, मंत्रालय मुंबई दिनांक २० ऑगष्ट २०१० अन्वये **माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच दिव्यांग माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदासाठी नेमणुकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यंत राहील.**

५.	पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार	५५ वर्षा पर्यंत (म.शा..सा.प्र.वि. शा.नि.दि.२.१.२०१९)
६.	खेळाडू उमेदवार	४३ वर्षा पर्यंत (म.शा..शा.शि.व क्री.वि शा.नि.दि.१.७.२०१६)
७.	भुकंप ग्रस्त	४५ वर्षा पर्यंत
८	स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे पाल्य	४५ वर्षा पर्यंत
९.	१९९१ चे जनगनना कर्मचारी / १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी	४५ वर्षा पर्यंत

सर्वसाधारण अटी :-

१. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. या पदासाठी ए-४ आकाराच्या चांगल्या दर्जाच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखीत /छापलेला सोबतच्या विहीत नमुन्यात अर्ज करावा. अर्ज सादर करतांना सामाजिक तसेच समांतर आरक्षणांतर्गत ज्या प्रवर्गातील पदासाठी अर्ज करावयाचा आहे, ते स्पष्टपणे अर्जाच्या सुरुवातीस नमूद करावे.

३. अर्जदाराने अर्जासोबत खालील प्रमाणे परिक्षा शुल्क (फी), न्यायालयीन फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प), भारतीय पोस्टल ऑर्डर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांचे नावे असलेला धनाकर्ष (D.D.) यापैकी कोणत्याही एका स्वरुपात जोडणे आवश्यक राहील.

अ.क्र.	प्रवर्ग	शिपाई पदाकरीता परिक्षा शुल्क
१	२	३
१	राखीव प्रवर्गातील उमेदवारासाठी	रु १५०/-

माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

४. अर्जावर व ओळख पत्रावर स्वत:चा पासपोर्ट साईज आकाराचा फोटो साक्षांकीत करुन नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाप्यावर **शिपाई** पदासाठी अर्ज करण्यात येत आहे असे स्पष्टपणे लिहावे .

५. शैक्षणिक तसेच इतर अर्हतेबाबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रती, महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र, जन्मतारखेसाठी जन्मतारखेचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र तसेच जाती प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास जाती वैधता बाबतचे प्रमाणपत्र) इत्यादि तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रत जोडलेली नसल्यास अर्ज रद्द समजण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

६. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

७. छाननीनंतर पात्र/अपात्र असलेल्या उमेदवारांची नांवे या कार्यालयाचे www.mahapwd.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. छाननी अंती पात्र उमेदवारानांच लेखी परिक्षेसाठी प्रवेश दिला जाईल.

९. महाराष्ट शासन सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३ **दि.५/६/२०१४ अन्वये गट ड वर्गाच्या पदाकरिता मौखिक परिक्षा घेण्यात येणार नाही**

१०. शिपाई पदाकरिता उमेदवारांची अंतिम निवड ही लेखी परिक्षेतील प्राप्त गुण व गुणवत्ता क्रमानुसार केली जाईल. **लेखी परिक्षा एकुण २०० गुणाची राहील.**

११. **शासन निर्णय दि.५/६/२०१४ अन्वये वरिल परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील.**

१२. महा.शासन सामान्य प्रशासन विभाग **शा.** निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र३०८/१६-ब,दि.२१.१२.२०१९ अन्वये **अनुसूचित जमाती मध्ये अर्ज करणा-या उमेदवारांना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.**

१३. उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१४. उमेदवाराला लेखी परिक्षाकरिता स्वखर्चाने यावे लागेल.

१५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहित उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत दिनांक २८.३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांचे संख्येबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावे.(अविवाहित उमेदवारांनी " **लागु नाही** " असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

१६. या जाहीरातीमध्ये कोणतेही फेरबदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राहातील.

१७. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल, अथवा भरती रद्द झाल्यास, याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१८. शासकिय /निमशासकिय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. परवानगीशिवाय सादर केलेल्या अर्जाचे आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्या जाणार नाही व तसे आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१९. पदाची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांच्या निवडीबाबत शासन निर्णय सा.प्र.वि.प्रनिम २००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ/दि २७ जून २००८ मध्ये दिलेल्या सूचनांच्या अधीन राहून निवड केल्या जाईल.

२०. **शिपाई पदाकरिता उमेदवारांची लेखी परिक्षा २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Objective type) असेल.प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतिल. महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.१२१४/ प्र.क्र. (४३/१४) / १३ दि.५/६/२०१४ अन्वये ज्या पदासाठी फक्त लेखी परीक्षा घेउन निवड करावयाची आहे अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेवून निवड करण्यात येईल.**

२१. **शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३अ/ मंत्रालय,मुंबई दि.२६.७.२०१४मध्ये विर्निधिष्ठ केल्यानुसार लेखी परिक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांनाच गुणानुक्रमे व्यावसयिक चाचणी देता येईल.तसेच दिनांक १९/१०/२००७ च्या आदेशातील परिच्छेद क्र.५ मधील क्र. १ ते क्र.४ येथील तरतुदीनुसार कार्यवाही करतांना गुणवत्ता यादीत अंतर्भाव करणेसाठी उमेदवाराने एकुण गुणाच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल. तसेच शासनाचे वेळोवेळी निर्गमित व प्रचलीत शासन निर्णयानुसार याबाबत कार्यवाही करण्यात येईल**

२२. दिनांक १ नोंव्हेबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन पारिभांषिक अंशदान निवृत्तिवेतन योजना लागु ठरेल, मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तिवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन)नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

२३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती, प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात रद्द करण्यात येईल.

२४. उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय/ जिल्हा सैनिक कार्यालय/ पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असले तरी पदाचे भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

२५. समांतर आरक्षणाची पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातील आरक्षित पदामधून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२६. या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाचे विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाचे अधीन राहील.

२७. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती बुलडाणा जिल्हयात कोठेही होऊ शकेल.

२८. अर्जासोबत (अर्जाचे माहितीचे पृष्ठयर्थ) अर्जात नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास) अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र इत्यादी व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यत उमेदवारांनी सादर केलेलीच कागदपत्रे विचारात घेतल्या जातील.त्यानंतर सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतल्या जाणार नाही.

२९. अर्जाच्या प्रथम पानावरील उजव्या बाजूला नुकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो साक्षांकीत करुन लावण्यात यावा.

३०. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्क शुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडण्यात येत असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडु नये. निवडी साठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

३१. सदर पदाकरीता उमेदवार पात्र नसल्याचे निदर्शनास आल्यास (उदा.शैक्षणिक अर्हता, जातीचा प्रवर्ग, वयोमर्यादा ईत्यादी) त्याची उमेदवारी लेखी परिक्षे नंतर केव्हाही रदद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३२. लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवाराची लेखी परिक्षेबाबतची माहिती, आसन क्रमांक, बैठक व्यवस्था, परिक्षा केंद्र, वेळापत्रक इत्यादी माहिती www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. या बाबत संबंधीतास पत्राव्दारे कळविण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

३३. परिक्षेस येताना उमेदवाराने अर्जासोबत जोडलेले ओळखपत्र वेगळे करुन सांक्षाकीत फोटोसह सोबत आणणे अनिवार्य आहे. (परिक्षेकरिता येताना उमेदवाराने इतर ओळखपत्र जसे पॅन कार्ड/आधार कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पासपोर्ट/ मतदान कार्ड / शाळा किंवा महाविदयालयाचे ओळखपत्र इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.) तसेच उमेदवाराने मूळ ओळखपत्र लेखी परिक्षेचे वेळेस परिक्षा केद्रांवर जमा करणे बंधनकारक असल्यामूळे या ओळखपत्राची अतिरिक्त छांयाकित प्रत उमेदवाराने स्वत:जवळ ठेवावी.

उमेदवारास स्वतंत्र प्रवेशपत्र (Hall Ticket) पोस्टाने पाठविण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३४. उमेदवारांचे पदभरतीचे विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रासह शासकीय सुटीचे दिवस वगळुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा कार्यालयात (सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० पर्यत) स्विकारण्यात येतील.

३५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र प्रअक /१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ/दि २७/१०/२००९ अन्वये / पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना सुशिक्षित बेरोजगाराना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. अशा मानधनावर काम केलेल्या अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयात नोंदणी असणे आवश्यक आहे व तशी नोंद झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

३६. नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी परीक्षा घेण्यात येईल. याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातून जाहीरातीव्दारे अथवा संकेत स्थळावरुन कळविण्यात येईल.

३७. सदर जाहीरात www.mahapwd.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

३८. लेखी परिक्षेकरिता तात्पुरती यादी प्रसिध्द केल्यानंतर खालील तक्त्यात नमुद प्रमाणे यादीबाबत आक्षेप दि.८.१.२०२० पर्यत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बुलडाणा या कार्यालयात सादर करण्यात यावे त्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही.

३९. परिक्षेसाठी भरावयाच्या अर्जाचे नमुने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बुलडाणा यांचे कार्यालयात तसेच सा.बां. विभाग, अकोला/वाशिम/खामगांव/बुलडाणा/जागतिक बॅंक प्रकल्प विभाग,अकोला /राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला या कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध असतील.

४०. सदरची जाहीरात शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८ / प्र.क्र.३०८ / १६ - ब / मंत्रालय मुंबई दि. २१ डिसेंबर २०१९ अन्वये देण्यात येत असून जाहीरातीमध्ये बदल किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहे.

४१. निवड प्रक्रिया कार्यक्रम

अ.क्र.	कार्यक्रम	शिपाई
१	२	४
१	अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक	६.१.२०२० सायंकाळी ५.३०वाजेपर्यंत
२	लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवाराची तात्पुरती यादी प्रसिध्द करणे	७.१.२०२०
३	तात्पुरत्या यादीवरील आक्षेप स्विकारण्याचा अंतिम दिनांक	८.१.२०२० सायंकाळी ५.३०वाजेपर्यंत
४	लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे	९.१.२०२०
५	उमेदवारांना परिक्षा केंद्राचे नाव,आसन क्र.वेबसाईटवर प्रसिध्द करण्याचा दिनांक	१०.१.२०२०
६	लेखी परिक्षा दिनांक	**१३.१.२०२०**
७	लेखी परिक्षेचा निकाल प्रसिध्द करण्याचा दिनांक	२०.१.२०२०
८	अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे	२९.१.२०२०

सदरच्या कार्यक्रमामध्ये बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवलेले आहे.

अर्ज स्विकारण्याचे स्थळ :

मुळ प्रत का.अ.यांचेकडून मंजुर

(एन.पी.लातुरकर)
उपकार्यकारी अभियंता
सा.बां.विभाग,बुलडाणा

कार्यालय, कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा
बुलडाणा पीन कोड : ४४३००१
दुरध्वनी क्रमांक : ०७२६२-२४२३९८

अर्जाचा नोंदणी क्रमांक

अर्जाचा नमुना

_____ या पदाकरिता _____ प्रवर्गातून नियुक्ती मिळण्याकरिता आवेदन पत्र

प्रति,
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा
एस. टी. बस स्टँडच्या बाजुला, बुलडाणा

१.	उमेदवाराचे संपूर्ण नांव Candidates full Name	---------- (आडनांव) (स्वत:चे नांव) (वडीलांचे/ पतीने नांव) ---------- (Surname) (First Name) (Father /Husband's Name)
२.	उमेदवाराचा कायमचा पत्ता (पिनकोड सह)	
३.	पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता (पिनकोड /दुरध्वनी / भ्रमण ध्वनी क्रमांकासह)	
४.	जन्म दिनांक (एस.एस.सी. बोर्डाच्या प्रमाणपत्राप्रमाणे)	
५.	दिनांक २६.१२.२०१९ रोजीचे वय.	----------वर्ष ----------महिना----------दिवस
६.	उमेदवार मागासवर्गीय आहे काय ?(लागू नसेल ते खोडावे)	होय /नाही
७.	सामाजिक आरक्षण :- (योग्य त्या ठिकाणी √ अशी खुण करावी) सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र / दाखला जोडावा.	

अ.जा. S.C.	अ.ज. S.T.	वि.जा.अ. V.J.A	भ.ज.ब N.T.B	भ.ज.क N.T.C	भ.ज.ड N.T.D	वि.मा.प्र. S.B.C.	इ.मा.व. O.B.C.	शै.सा.मा.प्र E.S.B.C	आ.दु.घ E.W.S.	खुला Open

८.	उमेदवार दिव्यांग आहे काय १ (लागु नसेल ते खोडावे)	होय /नाही
९.	असल्यास अपंगत्वाचा प्रकार व अपंगत्वाचे प्रमाण (टक्केवारी)	---------- - - - - - - - - - - - %

१०.	समांतर आरक्षण :- (योग्य त्या ठिकाणी √ अशी खुण करावी) सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र / दाखला जोडावा.						
	माजी सैनिक	महिला	पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवार	अपंग	खेळाडु	१९९१ चे जनगनना कर्मचारी /१९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी	प्रकल्प ग्रस्त /भुकपग्रस्त

११.	लिंग (स्त्री / पुरुष)	
१२.	उमेदवार विवाहीत आहे काय १ (विवाहीत असल्यास लहान कुंटूंब असल्याचे नमुना अ मधील प्रमाणपत्र आवश्यक आहे)	**होय / नाही**
१३.	महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय? (लागु नसेल ते खोडावे)	**होय / नाही**
१४.	अर्जासोबत बँक डिमांड ड्राफ्ट /पोस्टल ऑर्डर जोडले असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक व रक्कम नमुद करावी.	
१५.	समांतर आरक्षणा अंतर्गत शासकिय सेवेत नोकरी मिळविण्याकरीता यापुर्वी सवलतीचा लाभ घेण्यात आला आहे काय ? (असल्यास कार्यरत कार्यालयाचे नांव)	
१६.	**शैक्षणिक अर्हता /पदाकरीता आवश्यक अर्हता**	

अ. क्र.	परिक्षेचे नांव	शाळेचे /बोर्डाचे /विद्यापीठाचे संस्थेचे नांव	मिळालेल्या गुण (टक्के)	परिक्षाउत्तीर्ण झाल्याचे वर्ष
१	एस.एस.सी (दहावी)			
२	एच.एस.सी (बारावी)			
३	पदवी (बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी.अन्य)			
४	पदव्युत्तर पदवी/पदविका			
५	इंटर मिजीएट ग्रेड ड्रॉईग परिक्षा			
६	एम.एस.सी.आय.टी.(MS-CIT)			
७	टंकलेखन (मराठी / इंग्रजी)			
८	इतर			

१७.	शासकिय कामाचा अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे.	
१८.	सेवायोजन कार्यालयात नोंदणी आहे काय ? केली असल्यास सेवायोजन कार्यालयाचे नाव नोंदणी क्रमांक	होय /नाही सेवायोजन कार्यालयाचे नांव नोंदणी क्रमांक :
१९.	(अ) उमेदवार माजी सैनिक आहे काय ?	होय/ नाही
	(ब) उमेदवार लष्करी कार्यवाहीत मृत्यू पावलेल्या कुटूंबीयांपैकी आहे काय ? (लागु नसेल ते खोडावे)	होय/ नाही

२०.	मध्यवर्ती /राज्य शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे नियुक्ती प्राधिकारी यांचे मार्फत अर्ज सादर केले आहेत काय ?(कार्यरत कार्यालयाचे नांव)	होय/ नाही/ लागु नाही

२१.	**अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांच्या साक्षांकित प्रत जोडल्या आहेत काय ?**			
१	परिक्षा शुल्क भराल्या बाबतची कागदपत्रे			
२	एस.एस.सी. बोर्डाचे प्रमाणपत्र			
३	एम.एस.सी.आय.टी. परिक्षा किंवा संगणक ज्ञानाची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र			
४	पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र			
५	इंटर मिजीएट ग्रेड ड्रॉईंग परिक्षा प्रमाणपत्र			
६	टंकलेखनाची शासकीय व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र			
७	महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate)			
८	जन्म तारखेचा दाखला			
९	जात/ जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र			
१०	अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)			
११	विवाहीत /विवाहीता असल्यास लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र (नमुना अ नुसार)			
१२	उमेदवार शासकिय/निमशासकिय कर्मचारी असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुखाची परवानगी.			
१३	सेवायोजन कार्यालयाचे पंजीयन कार्ड			
१४	अपंगत्वाचे प्रमाणपत्र			
१५	माजी सैनिकास जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नांव नोंदणी केल्यचे प्रमाणपत्र			
१६	प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / पदविका, पदविधारक अंशकालिन / खेळाडू बाबतचे प्रमाणपत्र			

मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, वरील माहिती अचुक आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काही तक्रार राहणार नाही. नियुक्तीनंतर वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो १००५/१२६/सेवा-४/दि. ३१.१०.२००५ च्या परिभाषित अंशदान योजनेच्या तरतुदी मला मान्य राहतील. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र एप्रिल २८, २००५ मध्ये नमुद केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

दिनांक :- **अर्जदाराचे नाव व सही**

प्रतिज्ञापत्र

नमुना - "अ"

(नियम ४ पहा)

मी, श्री/ श्रीमती/कुमारी ----------

श्री.---------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी.

वय---------- वर्षे, राहणार----------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी---------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ---------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक---------- यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या---------- आहे (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण :

दिनांक :

(अर्जदाराची सही)

शिपाई या पदाचे परिक्षेकरीता उमेदवाराचे ओळखपत्र

फोटो

(उमेदवाराने भरावयाची व परीक्षेच्या वेळी आणण्यासाठी माहिती)

पदाचे नांव

१) उमेदवाराचे संपुर्ण नांव :- _____

२) परिक्षेचा आसन क्रमांक :- _____

३) परिक्षा केंद्र :- _____

४) परिक्षेचा दिनांक व वेळ :- _____

६) उमेदवाराची नमुना स्वाक्षरी :- _____

उमेदवाराचे नांव व सही

महत्वाची सुचना

१) फोटो राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

२) परिक्षेचा आसन क्रमांक, परिक्षा केंद्र व परिक्षेचा दिनांक व वेळ संकेतस्थळावरुन (Website) पाहून या ओळखपत्रावर उमेदवाराने नोंदवावी.

३) हे मुळ परिक्षेचे ओळखपत्र उमेदवारास परिक्षा केंद्रावर लेखी परिक्षेचे वेळी जमा करणे बंधनकारक असल्यामुळे या ओळखपत्राची अतिरिक्त झेरॉक्स प्रत उमेदवाराने स्वत: जवळ ठेवावी.

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा
एस. टी. बस स्टँडच्या बाजुला, बुलडाणा - ४४३००१
(E-mail - Address : buldhana.ee@mahapwd.com)
Web-www.mahapwd.com / दुरध्वनी क्रमांक २४२३९८

जाहिरात क्रमांक ९५५०/ आस्था-१ / २०१९ / दिनांक :- ३०.१२.२०१९

शुध्दीपत्रक

(खालील जाहीरात आपल्या वृत्तपत्रामध्ये दि. २९.१२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे त्यामध्ये शैक्षणिक पात्रते मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे)

सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा अंतर्गत खालील संवर्गातील पद सरळ सेवाभरतीने सामाजिक आरक्षण अंतर्गत भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून सोबतच्या नमुन्या तील अर्ज खालील नमुद केलेल्या ठिकाणी व्यक्तीश: किंवा टपालाने **दिनांक** ६.१.२०२० रोजी सायंकाळी **५.३०** वाजेपर्यन्त किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. **दिनांक** ६.१.२०२० नंतर टपालाने वा कोणत्याही मार्गे प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

रिक्त पदांचा तपशिल

अ क्र	पदनाम व गट	एकुण भराव याची पदे	वेतन बँड	सामाजिक आरक्षण	समांतर आरक्षण							सर्व - साधारण पदे	एकुण भराव याची पदे
					माजी सैनिक	महिला	खेळाडू	दिव्यांग	पदविधर / पदविकाधारक अंशकालीन	प्रकल्प ग्रस्त	भुकंप ग्रस्त		
१.	शिपाई (गट-ड)	१	एस-१ : - १५००० - ४७६००	अनुसूचित जमाती	०	०	०	०	०	०	०	१	१

अ.क्र.	पदनाम व गट	किमान शैक्षणिक अर्हता (म.शा.राजपत्र सा.प्र.वि.अधिसुचना दि.६.६.२०१७)
१.	शिपाई (गट-ड)	कमीत कमी १२ वा वर्ग पास असावा.

(वरील प्रमाणे १२ वा वर्ग पास असावा ही अट रदद करुन त्याऐवजी १० वा वर्ग पास असावा असे ठेवण्यांत येत आहे. बाकी इतर जाहीरात मध्ये कुठेही बदल नाही .)

(एन पी लातुरकर)
उपकार्यकारी अभियंता
सा.बां.विभाग,बुलडाणा

प्रतिलीपी :-१) दैनिक देशोन्नती बुलडाणा यांना प्रसिध्द करण्या करीता
(वरील जाहीरात आपल्या वृत्तपत्रामध्ये दि. २९.१२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे त्यामध्ये वरील प्रमाणे बदल असल्यामुळे परत आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत यावी.)

२) दैनिक मातृभुमी बुलडाणा यांना प्रसिध्द करण्या करीता
(वरील जाहीरात आपल्या वृत्तपत्रामध्ये दि. २९.१२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे त्यामध्ये वरील प्रमाणे बदल असल्यामुळे परत आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत यावी.)

३) दैनिक दिव्यमराठी बुलडाणा यांना प्रसिध्द करण्या करीता
(वरील जाहीरात आपल्या वृत्तपत्रामध्ये दि. २९.१२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे त्यामध्ये वरील प्रमाणे बदल असल्यामुळे परत आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत यावी.)